# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** जळगांव शहर **Year (वर्ष):** 2022
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0125 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/05/2022 23:37 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 19/05/2022
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/05/2022
**Time From (वेळेपासून):** 17:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 19/05/2022 **Time (वेळ):** 23:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 037 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/05/2022 23:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 0.5 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जळगांव तहसिल कार्यालयाच्या,पुरवठा शाखेच्या समोरील व्हरांड, जळगांव,जळगांव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** नुतन दत्तु कोळी
(b) **Husband's Name (पती चे नाव) :** दत्तु कोळी
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | C/o नथ्थु हवालदार यांचे राहते,घरात तान्हाजी मालुसरे नगर, ,जळगाव,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | भोलाणे ता जि जळगांव,भोलाणे,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):** विक्रेता

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8010726413

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पराग पुरुषोत्तम सोनवणे | | वडील का नाम : पुरुषोत्तम सोनवणे | 1. प्लट नं23, खोटे नगर,,जळगांव,जळगांव तालुका,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

1.पोलीस स्टेशन गुरनं. व कलम जळगांव शहर पो.स्टे. गुरनं 125/2022 ला.लु.प्रती अधिनीयम सन 1988 चे कलम 7 (अ) प्रमाणे2.मुळ तक्रारदार व फिर्यादीसौ. नुतन दत्तु कोळी, वय-28 वर्ष, व्यवसाय- भाजी पाला विक्री, रा. भोलाणे ता.जि.जळगांव. ह.मु. C/o नथ्थु हवालदार यांचे राहते घरात तान्हाजी मालुसरे नगर, जळगांव. 3. आरोपीचे नाव व पत्ता पराग पुरुषोत्तम सोनवणे, वय-39 वर्ष, धंदा- रोजनदारी, रा. प्लट नं.23, खोटे नगर, जळगांव.जि.जळगांव.(खाजगी व्यक्ती) 4.गुन्हा घडला ता. वेळ व ठिकाणदि.19/05/2022 रोजी 17.30 वा. जळगांव शहरात जळगांव तहसिल कार्यालयाच्या पुरवठा शाखेच्या समोरील व्हरांडयात 5. गुन्हा दाखल ता. वेळ दि.19/05/2022 रोजी 6.आरोपी अटक व ता. वेळ दि.19/05/20227.लाचेची मागणी व रक्कम 400/- रु.8.स्विकारली रक्कम 400/- रु. त्यात 100 रुपये दराच्या 04 चलणी नोटा 9.सावपळा व तपास अधिकारीपो.निरी. एन.एन.जाधव, न्टी करप्शन ब्युरो, जळगांव.थोडक्यात हकीकत- यातील फिर्यादी हे त्यांचे जुने रेशन कार्डची दुय्यम प्रत तयार करण्यासाठी विहीत नमुन्यातील फर्म भरुन जबाब व आवश्यक ते आधारकार्ड, उत्पन्नाचा दाखला इत्यादी कागदपत्रासह दि.13/05/2022 रोजी तहसिल कार्यालय जळगांव येथील पुरवठा शाखेच्या कार्यालयात गेले होते. तेव्हा आरोपी पराग सोनवणे (खाजगी इसम) यांनी फिर्यादी याचे जुने रेशन कार्डची दुय्यम प्रत तयार करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात 400/- रु. ची लाचेची मागणी केली त्याबाबत फिर्यादी यांनी दि.19/05/2022 रोजी ला.प्र.वि.जळगांव कार्यालयाकडे लेखी तक्रार दिली होती.सदर तक्रारीची दि.19/05/2022 रोजी ला.प्र.वि.जळगांव पथकाने पंच साक्षीदार समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी पराग सोनवणे (खाजगी ईसम) यांनी बेकायदेशिर मार्गाचा वापर करुन स्वत:चा आर्थिक फायदा करुन घेण्यासाठी तहसिल कार्यालय जळगांव येथील लोकसेवकांवर प्रभाव असल्याचे दर्शवुन फिर्यादी यांचे जुन्या रेशनकार्डची दुय्यम प्रत तयार करुन आणुन देतो असे सांगुन पंचासमक्ष फिर्यादी यांचेकडे 400/- रु लाचेची मागणी केली. तसेच सदर लाचेची रक्कम आरोपी यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडुन पंचासमक्ष स्विकारली म्हणुन गुन्हा.सोबत- संगणीकृत केलेली फिर्यादीची प्रत सोबत जोडली आहे.

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** vijaykumar narsingrao thakurwad(I (Inspector)) / **or (किंवा)** pi

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14.**Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Bholi

15.**Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** vijaykumar narsingrao thakur
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pi

फिर्याद

जळगांव शहर पोलीस स्टेशन, जि.जळगाव
दिनांक १९.०५.२०२२

**मी नुतन दत्तु कोळी, वय.२८ वर्षे, व्यवसाय घरकाम व मजुरी रा.मु.पो.भोलाणे ता.जि.जळगांव,ह.मु.तानाजी मालुसरे नगर,नथ्थु हवालदार यांचे घरात,नाना महाराजांची गल्ली,जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद देते की, मी वरील ठिकाणी माझ्या आई वडीलांसह राहते. मी घरकाम व मोलमजुरी करते. तसेच माझे आई व वडील देखील मजुरी करतात. त्यावर आमचे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. मी दि.१८.०५.२०२२ रोजी सायंकाळी अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयाचे पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील यांचेकडेस दुरध्वनीव्दारे जळगांव येथील एका लोकसेवकाविरुध्द लाचे संबधी तोंडी तक्रार केली होती.त्यानंतर लागलीच काही वेळाने माझे मोबाईल फोनवर अँन्टी करप्शन ब्युरोचे पोलीस निरीक्षक एन.एन.जाधव मॅडम यांचा फोन आला. तेव्हा त्यांनी मला विचारपुस केली. तेव्हा देखील मी त्यांना जळगांव येथील एका लोकसेवकाविरुध्द लाचे संबधी तक्रार असल्याचे कळविले. तेव्हा जाधव मॅडम यांनी मला दि.१९.०५.२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा. अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात हजर राहण्याबाबत सांगितले होते.

त्याप्रमाणे मी दि.१९.०५.२०२२ रोजी सकाळी ०८.०० वा. अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात हजर झाली. तेव्हा कार्यालयात पोलीस निरीक्षक एन.एन.जाधव मॅडम, पोलीस निरीक्षक एस.के.बच्छाव, दोन शासकिय पंच व पोलीस स्टॉप हजर होते. तेव्हा पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी कार्यालयात उपस्थित असलेल्या दोन शासकिय पंचाची,सापळा पथकाची व माझी आपआपसात ओळख करून दिली. त्यानंतर माझी लाचे संबधीची तक्रार पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयात माझे स्वतःचे हस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार माझे स्वतःचे हस्ताक्षरात लिहुन दिली ती खालील प्रमाणे.

समक्ष हजर राहुन तक्रार देते की, माझे वडील नामे दत्तु कडु कोळी यांच्या नावे आमच्या कुटुंबाचे जुने रेशनकार्ड असुन त्याचा ग्राहक क्रं.००८९८२९ असा आहे. सदरचे जुन्या रेशनकार्डमध्ये माझे वडील नामे दत्तु कडु कोळी, आई सौ.कलाबाई दत्तु कोळी, बहिण लक्ष्मी दत्तु कोळी व माझे असे एकुण ४ नावे आहेत. सदरचे रेशनकार्ड हे जळगांव शहर हददीतील आहे. सदरचे रेशनकार्ड हे जुने व जिर्ण झाल्याने खराब झालेले आहे.

सदरचे जुन्या रेशनकार्डची दुयम प्रत तयार करण्यासाठी विहीत नमुन्यातील फॉर्म भरुन,जबाब व आवश्यक ते आधारकार्ड, तलाठी यांचेकडील उत्पन्नाचा दाखला इत्यादी कागदपत्रांसह मी दि.१३.०५.२०२२ रोजी तहसिल कार्यालय जळगांव येथील पुरवठा शाखेच्या कार्यालयात गेली होती. सदर कार्यालयात एका टेबल समोरील खुर्चीवर सदर कार्यालयातील एक कर्मचारी हे काम करीत असल्याचे दिसले. तेव्हा मी त्यांचे जवळ गेली व त्यांना माझे जुन्या रेशनकार्डची दुयम प्रत काढावयाची आहे असे सागितले. तेव्हा सदर कर्मचारी यांनी माझे जवळील रेशनकार्डची दुयम प्रत मिळणेसाठीचा अर्ज घेवुन सदरचा अर्ज तपासुन व त्यासोबतचे कागदपत्रांची शहानिशा करुन सदर अर्जावर त्यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरात RC No. २७२०१९९७५६६५ असा नमुद करुन त्यांनी मला सांगितले की, तुमच्या जुन्या रेशनकार्डची दुयम प्रत तात्काळ तयार करुन पाहीजे असेल तर त्यासाठी तुम्हाला ४००/—रुपये मला दयावे लागतील. माझे नाव पराग सोनवणे असे आहे. तुम्ही ४००/—रु.माझेकडे दिल्यानंतर मी लागलीच तुम्हाला तुमच्या रेशनकार्डची दुयम प्रत तयार करुन आणुन देतो असे सांगितले.

त्यावेळी मी त्यांना सदर पैशाची पावती मिळेल का असे विचारले असता पराग सोनवणे यांनी मला, तुम्हाला कोणतीही पावती मिळणार नाही असे सांगितले व जर तुम्ही मला ४००/—रुपये दिले नाही तर तुम्हाला तुमचे रेशनकार्डची दुयम प्रत तयार करुन आणुन देणार नाही असे सांगितले.यावरुन तहसिल कार्यालय, जळगांव येथील पुरवठा शाखेतील पराग सोनवणे हे माझे जुन्या रेशनकार्डची दुयम प्रत तयार करुन आणुन देण्याचे मोबदल्यात ४००/—रु.लाचेची मागणी करीत असले बाबत माझे लक्षात आले.

परंतु सदर वेळी मी पराग सोनवणे यांना आता माझेकडे एवढे पैसे नाहीत,मी पैशांची व्यवस्था करुन तुम्हाला पुढच्या आठवडयात येवुन भेटते असे सांगुन निघुन आली आहे. तेव्हा पराग सोनवणे हे पैसे घेतल्या शिवाय कोणाचेही रेशनकार्डचे काम करीत नसल्याचे देखील मला समजले. पराग सोनवणे यांना ४००/—रूपये लाचेची रक्कम देण्याची माझी मनापासुन इच्छा नाही. परंतु मी जर पराग सोनवणे यांना लाचेची रक्कम दिली नाही तर ते मला माझे जुन्या रेशनकार्डची दुयम प्रत तयार करुन आणुन देणार नाहीत किंवा माझे जुन्या रेशनकार्डची दुयम प्रत तयार करुन देण्याच्या कामात विलंब करतील अथवा त्यामध्ये त्रुटया काढतील. म्हणुन मी नाईलाजाने पराग सोनवणे यांना ४००/—रुपये लाचेची रक्कम देण्यास तयार झाली असुन मी आज रोजी त्यांच्याशी लाचेसंबंधी बोलणी करण्याकरीता तहसिल कार्यालय जळगांव येथील पुरवठा शाखेच्या कार्यालयात जाणार आहे. बाबत नमुद आहे.

त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी पुढील सापळा कारवाई जळगांव शहरातील सागर पार्क मैदानात जावुन करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम, दोन शासकिय पंच, मी तसेच सापळा पथकातील काही कर्मचारी असे एका खाजगी कार क्रं.एम.एच.१४ जे एच.२७५५ या वाहनाने व एका मोटार सायकलवर सापळा पथकातील दोन कर्मचारी अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयातुन निघुन जळगांव शहरातील सागर पार्क मैदानात पोहचलो. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्रं. १ यांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन सदरचे मेमरीकार्ड मध्ये माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य घेतले. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी सदरचे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे अंगातील सनकोट व त्याखाली नेसुस

जळगांव शहर पोस्टे CCTNS गुरन १२४/2022 भ्रष्टाचार प्रति. अधिनियम कलम १९८८ चे कलम ७ (अ) प्रमाणे दि. १९.०५.२२ 23.20 वा नोंद घेतली आहे

पोलीस ठाणे अंमलदार

Nutan / DKoli

पंजाबी ड्रेसच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, पंच क्र.१ यांचेसह पराग सोनवणे यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय जळगांव येथील पुरवठा शाखेच्या कार्यालयात खाजगी ॲटो रिक्षाने पाठविले होते.

त्यानंतर मी व पंच क्र.०१ असे सदर ठिकाणाहुन निघुन सागर पार्क मैदानाचे बाहेर आलो. त्यानंतर रस्त्याने जाणा–या ॲटो रिक्षात हात देवुन सदर ॲटो रिक्षाने बसलो.त्यानंतर मी व पंच क्र.१ असे जळगांव शहरातील टॉवर जवळ ॲटो रिक्षातुन उतरलो. त्यानंतर सदर ठिकाणाहुन पायी पायी चालत जावुन मी व पंच क्र.१ असे तहसिल कार्यालय जळगांव येथे पोहचलो. त्यानंतर तहसिल कार्यालयातील पुरवठा शाखेच्या बाहेर असलेल्या व्हराडयांत गेलो. तेव्हा पराग सोनवणे हे सदर ठिकाणी उभे असल्याचे दिसले. तेव्हा ते घाई गरबडीत असल्याचे दिसले. त्यानंतर मी पराग सोनवणे यांची भेट घेतली. तेव्हा माझेत व पराग सोनवणे यांचेत माझे जुने रेशनकार्ड व दुयम रेशनकार्ड विषयी चर्चा झाली. तेव्हा पराग सोनवणे यांनी मला सदर व्हराडयांजवळ असलेल्या पाय–यांकडे इशारा करुन बसण्यास सांगितले व सदर ठिकाणी बसुन असलेल्या एका महिलेकडे इशारा करुन या बाईचे तेच काम आहे असे सांगितले. त्यानंतर पराग सोनवणे यांनी मला बसण्यास सांगितले. तेव्हा मी पराग सोनवणे यांना तुम्ही चारशे रुपये सांगितले होते असे बोलली असता त्यांनी मला तुझे काम होवु दे पहिले, आता किती आणले आहेत असे विचारले. तेव्हा मी त्यांना मी तशीच घाई गरबडीत निघाली असे सांगितले असता त्यांनी मला तु पैसेच आणले नाही हे मग, एक रुपया बी नही आणला तु, असे सांगितले असता मी पराग सोनवणे यांना माझे मैत्रिणीकडुन घेवुन येते व लगेच येते असे सांगितले व पराग सोनवणे यांना दादा येवु का मग मी,असे विचारले असता पराग सोनवणे यांनी मला उजव्या हाताच्या पहिल्या बोटाचा व अंगठयाचा पैश्यांचा इशारा करुन उजव्या हातानेच चार बोटे दाखवुन ४००/–रु.लाच मागणी केली व एवढा विचार नको करु असे सांगितले.

त्यानंतर मी व पंच क्र.१ असे सदर ठिकाणाहुन निघुन जळगांव शहरातील टॉवर चौकात आलो. त्यानंतर टॉवर चौकातुन ॲटो रिक्षात बसुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझे, पराग सोनवणे यांचे सोबत झालेले संभाषण दोन्ही पंचानी, पोनि.एन.एन.जाधव मॅडम व सापळा पथकाने ऐकले. तेव्हा पराग सोनवणे यांनी माझे जुन्या रेशनकार्डची दुयम प्रत तयार करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात माझेकडेस ४००/–रु.लाचेची मागणी केल्याबाबत खात्री झाली. तेव्हा वेळ कमी असल्याने पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी सदर सापळा कारवाई सलगपणे करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला ४००/–रु.हजर करण्यास सांगितले. तेव्हा मी माझे घर खर्चातुन आणलेले ४००/–रु त्यात १००/–रु.दराच्या ०४ नोटा पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांचे समक्ष हजर केले. त्यानंतर पोनि.एन.एन. जाधव मॅडम यांनी मी हजर केलेले ४००/–रु त्यात १००/–रु.दराच्या ०४ नोटांना अ.पा.पावडर लावुन सदरच्या नोटांची घडी करुन पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी माझे अंगातील सनकोटच्या पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या.

त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्र.१ यांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या.त्यांनतर पोनि.एन.एन. जाधव मॅडम यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे अंगातील सनकोट व त्याखाली नेसुस पंजाबी ड्रेसच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, पंच क्र.१ यांचेसह पराग सोनवणे यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय जळगांव येथील पुरवठा शाखेच्या कार्यालयात पाठविण्याचे ठरविले.

त्यानंतर पो.नि.एन.एन.जाधव मॅडम, पो.नि.बच्छाव साहेब, मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील एक कर्मचारी असे सोबत आणलेल्या खाजगी कारने तसेच सापळा पथकातील दोन कर्मचारी सोबत आणलेल्या मोटार सायकलने सदर ठिकाणाहुन निघुन आकाशवाणी चौक, नविन बस स्टॅंड,नेहरू पुतळा चौक, रेल्वे स्टेशन मार्गे नविन बांधकाम सुरू असलेल्या पुलाजवळ पोहचलो.त्यानंतर पो.नि.एन.एन.जाधव यांनी मला व पंच क्रं. १ अशांना सदर कारच्या खाली उतरवुन हाताच्या इशा–याने तहसिल कार्यालयाकडे जाण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रं. १ असे सदर कारच्या खाली उतरलो व पायी पायी चालत जावुन जळगांव तहसिल कार्यालय येथे गेलो. त्याचवेळी पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी सदर कार्यालयाच्या आजुबाजुस सापळा लावला होता. त्यानंतर मी व पंच क्रं. १ असे तहसिल कार्यालयातील पुरवठा शाखेच्या बाहेर असलेल्या व्हराडयांत गेलो. तेव्हा मला पराग सोनवणे हे दिसुन आले नाही. म्हणुन त्यांची वाट पाहत थांबुन राहीली. त्यानंतर काही वेळाने पराग सोनवणे हे माझे जवळ आले व माझे सोबत चल असे सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.१ असे त्यांचे सोबत गेलो.तेव्हा त्यांनी मला बाहेर थांबण्यास सांगितले व ते सदर कार्यालयात जावुन परत आले. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, मी तुला साहेबांजवळ घेवुन जातो, माझे नाव नको सांगु असे सांगुन बसण्यास सांगितले व साहेब आल्यावर मला सांग, माझी आई ॲडमिट आहे असे सांगण्यास सांगुन पुरवठा कार्यालयाच्या समोर बसण्यास सांगितले. त्यानंतर पराग सोनवणे हे पुन्हा सदर आवारात फिरुन माझे जवळ आले व त्यांचे जवळील रेशनकार्डमधील माझे व माझ्या कुटुंबातील नावे वाचुन दाखविले.त्यानंतर पराग सोनवणे यांनी माझा मोबाईल नंबर घेतला. त्यानंतर पराग सोनवणे यांनी मला त्यांच्या उजव्या हाताच्या पहिल्या बोटाने व अंगठयाने पैश्यांचा इशारा करुन उजव्या हातानेच चार बोटे दाखवुन ४००/–रु. लाच मागणी केली. तेव्हा मी माझे डाव्या हाताने माझे अंगातील सनकोटच्या पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात असलेली लाचेची रक्कम ४००/– रुपये बाहेर काढुन पराग सोनवणे यांचे समोर धरली व चारशे रूपये आहेत असे सांगितले असता पराग सोनवणे यांनी सदर लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन घेतली.त्यानंतर मी लागलीच ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास १७.३० वाजता इशारा केला.तेव्हा पो.नि.एन.एन. जाधव मॅडम व सापळा पथक यांनी पराग सोनवणे यांना रंगेहाथ पकडले.

त्यानंतर पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांनी माझे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा पो.नि. एन.एन.जाधव मॅडम यांनी पराग सोनवणे यांना आपली स्वत:ची तसेच पो.नि.एस.के.बच्छाव व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांनी पराग सोनवणे यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव

पराग पुरूषोत्तम सोनवणे, वय ३९,व्यवसाय रोजंदारी रा.प्लॉट नं. २३,खोटे नगर, जळगांव जि.जळगांव (खाजगी व्यक्ती)असे सांगितले. तेव्हा पो.नि.जाधव मॅडम यांनी पराग सोनवणे यांना तुम्ही तहसिल कार्यालय येथे शासकीय नोकर म्हणुन नोकरीस आहात काय? अशी विचारणा केली असता पराग सोनवणे यांनी मी शासकीय नोकर नसुन मी तहसिल कार्यालयाचे आवारात थांबुन गरजु लोकांचे रेशन कार्ड, सॉल्वंशीचे काम व उत्पन्नाचे दाखले काढुन देण्याचे काम करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील कारवाई अँन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात करण्यात आली. सदर कार्यालयातील एका रुममध्ये पराग सोनवणे, माझे व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतरची पुढील उर्वरीत सापळा कारवाई पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांनी अँन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात केली आहे. तसा सविस्तर एकत्रीत पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे दि.१९.०५.२०२२ रोजी पराग पुरुषोत्तम सोनवणे,रा.प्लॉट नं.२३,खोटे नगर,जळगांव जि.जळगांव (खाजगी व्यक्ती)यांनी बेकायदेशिर मार्गाचा वापर करून स्वत:चा आर्थिक फायदा करुन घेण्यासाठी तहसिल कार्यालय जळगांव येथील लोकसेवकांवर प्रभाव असल्याचे दर्शवुन माझे जुन्या रेशनकार्डची दुयम प्रत तयार करून आणुन देतो असे सांगुन माझेकडे ४००/ रुपये लाचेची मागणी केली.सदर ४००/–रुपये लाचेची रक्कम दि.१९.०५.२०२२ रोजी १७.३० वाजता जळगांव तहसिल कार्यालयाच्या पुरवठा शाखेच्या समोरील व्हरांडयात स्विकारली असता त्यास रंगेहात पकडण्यात आले.म्हणुन माझी पराग पुरुषोत्तम सोनवणे यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

सदरची फिर्याद मी स्वत: वाचुन पाहिली ती माझे माहिती प्रमाणे व घडलेल्या हकीगतीप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**समक्ष**

**एन. एन. जाधव**
**पोलीस निरिक्षक**
**अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**

**फिर्यादीची सही**
**दिनांक १९.०५.२०२२**

( नुतन दास कोळी )